# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): पालघर  **P.S.**(ठाणे): मनोर  **Year** (वर्ष): 2020

   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0021  **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 31/01/2020 23:22 बजे

2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7, 7(अ), |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

   1. **Day**(दिवस): शुक्रवार  **Date From** (दिनांक पासून): 31/01/2020

      **Time Period** (कालावधी): पहर 4  **Date To** ( दिनांक पर्यंत): 31/01/2020

      **Time From** (वेळेपासून): 12:10 बजे

      **Time To** (वेळेपर्यंत): 12:10 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

   **Date** (दिनांक ): 31/01/2020  **Time** (वेळ): 22:32 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

   **Entry No.** (नोंद क्र.): 029  **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 31/01/2020 22:32 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

   1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पूर्व, 2 किमी

   **Beat No.** (बिट क्र.):

   (b) **Address** (पत्ता): मिलन हॉटेल मनोर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

   **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

   (a) **Name** (नाव): धर्मा कोंड्या सुतार

   (b) **Guardian's Name** (पालक चे नाव) :

   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1978  (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.):  **Date of Issue** (दिल्याची तारीख):

   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address** (पत्ता):



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | नवी दापचरी,पालघर,मनोर,पालघर,महाराष्ट्र,401403,भारत |
| 2 | स्थायी पता | नवी दापचरी,पालघर,मनोर,पालघर,महाराष्ट्र,401403,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-7875748858

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | साईनाथ दिलीप कुंवर | | | 1. खुशी आंगण बिल्डींग नं 3,रुम नं303 मनोर ,पालघर,मनोर,पालघर,महाराष्ट्र, भारत-401403 |
| 2 | रोशन पांडु धांगडा | | | 1. परीक्षेत्र मनोर,कोसबाड बिट ,पालघर, मनोर,पालघर,महाराष्ट्र,भारत-401403 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 4000 रुपये रक्कमेची लाच स्विकारली | 4,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 4,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गुन्हा रजि.नं. 21/ 2020 भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा सन 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7,7(अ) प्रमाणे. फिर्यादी नाव पत्ता -श्री.धर्मा कोंड्या सुतार वय 42वर्ष धंदा-शेती रा.नवी दापचरी पो.मनोर ता.जि.पालघर मो.न. 7875748858आरोपीत नाव पत्ता -1)साईनाथ दिलीप कुंवर वय 28वर्ष धंदा-नोकरी वनरक्षक परीक्षेत्र मनोर कोसबाड बिट डहाणु वनविभाग जि.पालघर रा.खुशी आंगण बिल्डींग नं 3,रुम नं.303 मनोर ता.जि.पालघर 2)रोशन पांडु धांगडा वय 28वर्ष धंदा-नोकरी खाजगी सुरक्षा रक्षक परीक्षेत्र मनोर कोसबाड बिट डहाणु वनविभाग जि.पालघरअ.घ.ता. वेळ व ठिकाण - दिनांक 31/01/2020 रोजी 12.10वा.चे सुमारास मिलन हटेल मनोर ता.जि.पालघर येथे उशिराचे कारण - तात्काळ हकीगत यातील तक्रारदार यांना कृषी विभागाकडुन बिरसा मुंडा योजनेतुन सन 2019-2020 या वर्षी विहीर मजुर झालेली आहे सदर विहीरीचे बांधकाम करणेकरीता दि.29/01/2020 रोजी तक्रारदार यांनी त्यांचे शेतामध्ये खोदकाम करुन दगड ट्रकमध्ये भरत असताना आरोपी लोकसेवक क्र.1यांनी तक्रारदार यांचेकडे गाडी सोडविण्याकरीता प्रथम 5,000 घेवुन पुन्हा 5,000 रुपये घेवुन येण्यास सांगीतल्याने तक्रारदार यांनी लोकसेवक आरोपीत क्र.1यांचेविरुध्द अँन्टी करप्शन ब्युरो ठाणे कम्प पालघर येथे दि.30/01/2020रोजी लेखी तक्रार दिली आहे. तक्रारीचे अनुषंगाने दि.30/01/2020रोजी पंच साक्षीदार समक्ष पडताळणी केली असता आरोपीत लोक सेवक क्र. 1यांनी तक्रादार यांचेकडे त्यांना 4 -5हजार रुपये व दादाला 10,000रुपये द्यावे लागतील असे सांगुन तोडजोडी अंती 4 हजार रुपये लाचेची मागणी करुन दि.31/01/2020रोजी सदर लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगीतल्याचे स्पष्ट झाले आहे तसेच दि.31/01/2020रोजी सापळा पुर्व व सापळा पंचनाम्यामध्ये लोकसेवक आरोपीत क्र.1व आरोपीत क्र.2खाजगी इसम यांना सदर लाचेची रक्कम तक्रारदार यांच्याकडुन ता. म. वेळी व जागी स्विकारताना रंगेहात पकडले आहे म्हणुन गुन्हा.दाखल अमलदार - पोहवा/337 डी.ए.जनाठे नेम- मनोर पोलीस ठाणे मो.क्र. 9890088283 तपासिक अंमलदार - पो.उप.अधि./श्री.कलगोंडा हेगाजे नेम -ऍन्टी करप्शन ब्युरो ठाणे कम्प पालघर मो.नं. 9552250404 भेट देणारे अधिकारी - पो.उप.अधि./श्री.कलगोंडा हेगाजे नेम - ऍन्टी करप्शन ब्युरो ठाणे कम्प पालघर मो.नं. 9552250404 फिर्याद दिनांक :- 31/01/2020 मी धर्मा कोंडया सुतार, वय 42



Scanned by CamScanner

वर्षे, धंदा शेती, रा. नवी दापचरी, पो. मनोर, ता.जि.पालघर. मो. 7875748858 समक्ष फिर्याद लिहुन देतो की, मी वरीलप्रमाणे असून वर नमुद ठिकाणी माझे कुटूंबासह राहतो. माझी मौजे नवी दापचरी येथे शेती असून तिचा गट क्र. 81 असा आहे. मला कृषी विभागाकडून बिरसा मुंडा या योजनेतून सन 2019-2020 या वर्षी विहिर मंजूर झालेली आहे. सदरची विहिर खोदकाम करून पूर्ण झालेले असून विहिरीचे बांधकाम करणे बाकी आहे. मी दिनांक 29/01/2020 रोजी विहिरीचे बांधकाम करण्याकरिता माझे शेतामध्ये खोदकाम करून दगड काढून ट्रक भरत होतो. त्यावेळी सदरच्या ट्रकवर श्री.सुनिल किसन रोज, रा.कोसबाड, नवी दापचरी, पो.मनोर, ता.जि.पालघर हे ड्रायव्हर होते. सदरचा ट्रक भरत असताना वन विभागाचे फरेस्टर साईनाथ कुंवर हे सदर ठिकाणी आले व म्हणाले की, ट्रक घेवून ऑफीस ला चला ... गाडी सोडवायची असेल तर ईथेच दिड लाख रूपये दया. त्यावेळी मी त्यांना आता माझेकडे इतके पैसे नाहीत असे सांगितले. तेव्हा साईनाथ कुंवर यांनी मला पन्नास हजार रूपये दया. असे सांगितले. परंतु मी त्यांना माझेकडे इतके पैसे नाहीत असे सांगितले असता, त्यांनी माझेकडून पाच हजार रूपये घेतले. व नंतर पुन्हा पाच हजार रूपये घेवून ये असे मला सांगितले. त्यावेळी श्री.अर्जून रामा वळवी, रा.नवी दापचरी, पो.मनोर, ता. जि.पालघर, हे देखील तेथे हजर होते. वनविभागाचे फरेस्टर साईनाथ कुंवर यांनी माझेकडे मागणी केलेली लाचेची पाच हजार रूपये रक्कम देण्याची इच्छा नसल्याने मी त्यांचेविरोधात दिनांक 30/01/2020 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कम्प पालघर कार्यालयात लेखी तक्रार दिलेली आहे. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे यानी दिनांक 30/01/2020 रोजी जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय, पालघर यांचेकडून दोन सरकारी पंच साक्षीदार बोलावून घेतले व त्यांचेशी माझी ओळख करून दिली. त्यानंतर सदर पंचाना माझे तक्रारीच्या संबंधाने थोडक्यात हकीगत सांगून मी दिलेली लेखी तक्रार वाचण्यास दिली. सदरची तक्रार दोन्ही पंचांनी वाचल्यानंतर त्यावर दोन्ही पंचांनी व समक्ष म्हणून पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे यांनी सहया केल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे यांचे सुचनेप्रमाणे दोन्ही पंच व पडताळणी पथक असे पडताळणी कामी लागणा-या साहीत्यासह शासकीय वाहन क्र. एम.एच. 04, ई.पी. 5454 ने मनोर येथे आलो. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे यांचे सुचनेप्रमाणे माझे अंगावर व्हईस रेकर्डर लावून मी पंच नं. 01 यांचेसह लोकसेवक साईनाथ कुंवर यांचे मनोर येथील वन विभागाच्या कार्यालयात गेलो असता, तेथील कर्मचारी यांनी लोकसेवक साईनाथ कुंवर हे त्यांचे रूममध्ये गेल्याचे सांगीतले. त्यामुळे मी तेथून पंच नं. 01 यांचेसह निघून बाजुलाच असलेल्या लोकसेवक साईनाथ कुंवर यांचे रूममध्ये गेलो. तेथे गेल्यानंतर तेथील वन विभागाच्या एका व्यक्तीने लोकसेवक साईनाथ कुंवर हे मस्तान नाका येथे गेल्याचे सांगून त्यांचे मोबाईल फोनवरून लोकसेवक साईनाथ कुंवर यांचे फोनवर फोन लावून माझे बोलणे करून दिले. त्यावेळी लोकसेवक साईनाथ कुंवर यांनी मला मस्तान नाका येथे येण्यास सांगीतले. त्याप्रमाणे मी पंच नं. 01 यांचेसह मस्तान नाका येथे जावून लोकसेवक साईनाथ कुवर यांना भेटलो असता, मी त्यांना माझे कामाच्या अनुशंगाने काही कमी करा असे सांगीतले असता, त्यांनी मला सांगीतले की, आता झालं की सगळं, काय कमी करायचं, असे म्हणून गाडी नेली असती तर तीस हजार घेतले असते, तसेच पुढे काम चालु ठेवयाचं असेल तर मला चार पाच हजार रूपये व दादाला सांगायला लागेल व त्यांना दहा हजर रूपये दयावे लागतील. असे म्हणून तडजोडीअंती 4000/- रू स्विकारण्याचे मान्य केले. व दिनांक 31/01/2020 रोजी सदरची लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगीतले. सदरबाबतचे लोकसेवक साईनाथ कुवर यांचेषी समक्ष भेटीत झालेले संभाशण माझे अंगावर लावलेल्या व्हईस रेकर्डरमध्ये ध्वनिमुद्रीत झालेले आहे. सदरबाबत पोलीस उप अधीक्षक श्री हेगाजे यांनी सविस्तर पंचनामा केलेला आहे. तसेच सापळा कारवाईबाबत सर्वांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे दिनांक मी 31/01/2020 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे व त्यांचेसाबतचे दोन्ही पंच तसेच सापळा पथक यांना मनोर येथील मुंबई-अहमदाबाद हायवेवरील अनम हटेल मधील पार्कींग मध्ये भेटले. त्यानंतर लोकसेवक साईनाथ कुंवर यांनी मागणी केलेल्या लाचेच्या रक्कमेस पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे यांचे सुचनेप्रमाणे सापळा पथकाने आंथ्रासीन पावडर लावून अल्ट्राव्हयलेट दिव्याचे प्रात्यक्षीक करून दाखविले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे यांचे सुचनेप्रमाणे मी माझे मोबाईल नंबर 7875748858 वरून लोकसेवक साईनाथ कुंवर यांचे मोबाईल क्र. 9146547847 वर फोन करून त्यांची कोठे भेट होईल? याबाबत चर्चा करून मिलन हटेल, मनोर येथे भेटण्यास सांगीतले. सदरचे फोनवरील संभाशण व्हईस रेकर्डरच्या मदतीने ध्वनिमुद्रीत करण्यात आलेले आहे. त्यानंतर लोकसेवक साईनाथ कुंवर यांना मिलन हटेल,येथे भेटण्याचे ठरले असल्याने पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे यांचे सुचनेप्रमाणे माझेकडे आंथ्रासीन पावडर लावलेली लाचेची रक्कम देवून पंच नं. 01 यांचेसह मिलन हटेल, मनोर येथे अॅन्टी करप्षन ब्युरोचे पथक सापळा लावून थांबले. त्यानंतर लोकसेवक साईनाथ कुंवर व त्यांचेसोबत आरोपी खाजगी ईसम रोषन धांगडा असे मनोर येथील मिलन हटेल येथे आले. त्यावेळी मी लोकसेवक साईनाथ कुंवर यांनी मागणी केल्याप्रमाणे माझेकडील आंथ्रासीन पावडर लावलेली 4000/- रू लाचेची रक्कम लोकसेवक साईनाथ कुंवर यांचेसमोर धरली असता, त्यांनी सदरची रक्कम त्यांचेसोबत असलेल्या खाजगी ईसम रोषन धांगडा यांचेकडे देण्यास सांगीतली असता, मी माझेकडील लाचेची रक्कम खाजगी ईसम रोषन धांगडा यांचेकडे दिली असता, त्यांनी ती मोजून लोकसेवक साईनाथ कुंवर यांचेकडे दिली. त्यावेळी मी पोलीस उप अधीक्षक श्री. हेगाजे यांनी सांगीतलेला पुर्वनियोजीत ईशारा केला असता, अॅन्टी करप्षन ब्युरोच्या सापळा पथकाने लोकसेवक साईनाथ कुंवर व रोशन धांगडा यांना ताब्यात घेतले. व माझे अंगावरील व्हईस रेकर्डर बंद केला. सदरबाबत सविस्तर सापळा पंचनामा करण्यात आलेला आहे. तरी यातील आरोपी लोकसेवक साईनाथ दिलीप कुंवर, वय 28 वर्षे, वनरक्षक, परिक्षेत्र मनोर, कोसबाड बिट, डहाणू वनविभाग, जि. पालघर रा. खुशी आंगण, बिल्डींग नं. 03, रूम नं. 303, मनोर ता.जिल्हा पालघर यांनी मी दिनांक 29/01/2020 रोजी माझे मौजे नवी दापचरी येथील शेतामध्ये खोदकाम करून काढलेल्या दगडांचा ट्रक भरत असताना सदर ठिकणी येवून सदरचे दगड भरून नेण्यास हरकत घेवून ते काम पुढे चालू ठेवण्यासाठी 5000/- रू रक्कम घेवून आणखी 5000/- रू घेवून येण्यास सांगीतले होते. त्याबाबत वरीलप्रमाणे कारवाई पुर्ण करून दिनांक 31/01/2020 रोजी सापळा कारवाई केली असता, 1) आरोपी लोकसेवक साईनाथ दिलीप कुंवर, वनरक्षक, परिक्षेत्र मनोर, कोसबाड बिट, डहाणू वनविभाग, जि. पालघर यांचेमार्फतीने 2) आरोपी खाजगी ईसम रोशन पांडु धांगडा,वय 28वर्ष, खाजगी सुरक्षा रक्षक, परिक्षेत्र मनोर, कोसबाड बिट, डहणू वनविभाग, जिल्हा पालघर यांना दिनांक 31/01/2020 रोजी 12.10 वा. च्या सुमारास मिलन हटेल, मनोर, ता.जिल्हा पालघर येथे स्विकारताना पकडले आहे म्हणून माझी त्यांचेविरूध्द फिर्याद आहे. सदरची फिर्याद ही मी सांगितल्याप्रमाणे मराठीत संगणकावर टंकलीखीत करण्यात आली असून, ती मला वाचून व समजावून सांगितली ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.



Scanned by CamScanner

13. **Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Pratap Pandurang Darade(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
मनोर पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): Pratap Pandurang Darade
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API



Scanned by CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned by CamScanner